3

# सल्तनतकालीन इतिहासाची महत्वाची लिखित साधने

**सचिन गुंडीराम डेंगळे**
संशोधक विद्यार्थी,
प्राथमिक पदवीधर, जि.प.प्रा.शा.अजनी (बु.)
ता. शिरुर अनंतपाळ जि. लातूर

प्राचीन भारतीय इतिहासाने भारतीयांना आणि जगाला अत्यंत समृद्धा असा सांस्कृतीक, कलात्मक आणि परधर्म सहिष्णुतावादी विचारांचा वारसा दिला. मध्ययुगीन भारताचा इतिहास अरब आणि काही अंशी धर्माच्या स्वरुपाचा होता. म्हणूनच त्याचे पडसाद भारतीय इतिहासावर या कालखंडात दिसतात. मुस्लिम आक्रमणामुळे जगाच्या इतिहासात समृद्धी आणि वारसा कृमशः लोप पावले. हर्षवर्धनाच्या नंतर उत्तर भारतात छोटी मोठी राज्ये अस्तित्वात होती. पण त्यांच्यात संघटन नव्हते याचा फायदा परकीय सत्ताधिशांनी घेतला आणि इ.स. 11 व्या शतकापासून ते इंग्रजाच्या हाती सत्ता येईपर्यंत भारतावर या सत्ताधिशांनी आपले वर्चस्व गाजविले. या प्रदीर्घ कालखंडात राजकीय, सामाजीक, धार्मिक जीवनात या सत्ताधिशांच्या जीवनशैलीच्या पाऊलखुणा उमटलेल्या दिसतात या प्रदीर्घ कालखंडात भारतीय संस्कृती इस्लाम संस्कृती यांचे एककत्रीकरण  झाल्याचे दिसते.

काही इतिहासकारांच्या मते मध्ययुगाची सुरुवात इ.स. 1001 पासून झाली तर काहींच्या मते 1206 मध्ये झाली. असे मानले जाते. परंतु एखादे युग किंवा कालखंड ठरावीक शतकात सुरु होते अथवा संपते असे होत नाही. याला प्रदीर्घ कालावधी लागतो. प्राचीन कालखंडातून मध्ययुगीन कालखंडाकडे संक्रमण होत असताना राजकीय सामाजीक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतीक या प्रत्येक क्षेत्रात स्थित्यंतरे झाले आहेत.

मुस्लिम राज्यकर्त्यांना इतिहास लेखनात रूची होती. त्यांनी आपल्या दरबारातील मंडळीना, लेखकांना इतिहास लेखनाचे काम सोपविले. मध्ययुगीन काळात झालेल्या लिखाणामागील मुळ प्रेरणा धार्मिक होती. आपल्या धर्माच्या, विजयाच्या इतिहासाची नोंद तत्कालीन लेखकांनी घेतली. या ऐतिहासिक साधनांच्या उपलब्धतेमुळे मध्ययुगीन भारताचा इतिहास सलगपणे मांडता येतो.

या साधनांमध्ये ताम्रपट, शिलालेख कलाकृती इ. पूरातत्वीय साधनांचा समावेश होतो. आत्मचरित्रे, चरित्रे, प्रवासवर्णने, कागदपत्रे इ. पुरातत्वीय साधनांचा समावेश होतो. मध्ययुगीन भारताच्या इतिहासात सुलतानशाहीचा कालखंड आणि मोगलशाहीचा कालखंड असे दोन प्रमुख कालखंड आहेत. यातील पूर्व मध्ययुगीन कालखंड म्हणजेच सुलतानशाहीच्या लिखित साधनांची माहिती पुढिलप्रमाणे.

**लिखित साधने : -**

मध्ययुगीन भारताच्या लिखित साधनांमध्ये संस्कृत, पर्शियन, अरबी आणि विविध प्रादेशिक भाषेतील साहित्य, तवारिखा, दफ्तर, बखर साहित्याचा समावेश होतो. सुलतानशाहीच्या काळात पर्शियन भाषेला राजाश्रय प्राप्त झाला. सुलतानांनी पर्शियन भाषेला मानाचे स्थान दिले म्हणून संस्कृत ही भारतीयांची प्राचीन भाषा असूनही मागे पडली. प्रतिकूल परिस्थितीतही संस्कृत भाषेत मौलिक साहित्य निर्माण झाले.

सुलतानशाहीच्या काळात अस्तित्वात असलेल्या विविध प्रांतीक राज्यांमध्ये संस्कृत भाषेविषयी आदर होता. त्यांच्या काळात त्या आधारे तत्कालिन, सामाजिक, राजकीय, धार्मिक व सांस्कृतिक घटकांचा / परिस्थितीचा अभ्यास करता येतो.

**कल्हणचे - ' राजतरंगिणी ' :-**

14 व्या शतकाच्या उत्तरार्धात बरेच संस्कृत साहित्य पर्शियन भाषेत भाषांतरीत करण्यात आले. मध्ययुगीन कालखंडात कल्हणने राजतरंगिणी हा ग्रंथ लिहीला. या ग्रंथावरून 'काश्मीरच्या इतिहासाची' माहिती मिळणे.

या बरोबरच मलकाचार्य यांनी 'उदरराधव' हा ग्रंथ लिहीला अगस्त या लेखकाने महाभारतातील विविध प्रसंगाचे चित्रण करणारी पुस्तके लिहिली संस्कृत भाषेत ऐतिहासिक घटनांवर प्रकाश टाकणारे राजतरंगिणी, राजवती पताका हे ग्रंथ महत्त्वपूर्ण मानले जातात.

**चचनामा :-**

इ.स. 711 ते 712 या काळात ' सिंधमधील तत्कालीन सामाजिक आणि राजकीय स्थितीचे चित्रण '  चचनामात केले आहे. या ग्रंथाचा कर्ता अज्ञात आहे. सिंध भागात दाहिर या राजाचे राज्य होते. मुस्लिम आक्रमणात दाहिर राजा पराभूत  झाला आणि सिंधचा प्रदेश मुस्लिम सत्तेखाली आला. सिंधचे राज्य चच याने स्वतःकडे कशाप्रकारे घेतले  यांची माहिती या ग्रंथातून मिळते. त्याच्या नावावरूनच या ग्रंथास चच्नामा असे नाव देण्यात आले आहे.  हा ग्रंथ मुळ आरबी भाषेत आहे. याचा फारसी भाषेतही अनुवाद केला गेला आहे. यालाच फत्तेह नामा सिंध या नावानेही ओळखले जाते.

**तारिख - उल - हिंद :-**

भारताचा अभ्यास करणाऱ्या मुस्लिम अभ्यासकामध्ये अल्बेरूनी महत्त्वाचा अभ्यासक आहे त्याने अरेबिक भाषेत तारिख - उल - हिंद हा मौलिक ग्रंथ लिहला या ग्रंथाद्वारे '11 व्या शतकात हिंदूंच्या साहित्य, धर्म विज्ञान इ. विषयी माहिती ' मिळते.

अल्बेरूनी हा चालता बोलता विश्वकोष होता. गणित, तत्व-ज्ञान, भूगोल, खगोलशास्त्र, धर्मशास्त्र, तर्कज्ञान अशा अनेक विषयांचा गाढा अभ्यासक होता. त्याच्या विद्वत्तेमुळे मध्ययुगीन लिखित साधनांमध्ये मौलाची भर पडली महमंद गझनीच्या 1018 ते इ.स. 1019 या काळात भारतावरील झालेल्या स्वारीत अल्बेरूनी गझनीच्या सैन्यात सामील होता. या सैन्याबरोबरच तो भारतात आला. भारतात भ्रमण करून हिंदु धर्म, धर्माचे तत्वज्ञान याचा अभ्यास करून अरबी भाषेतून तारिख उल - हिंद हा पर्शियन भाषेत भाषांतरी करण्यात आला. पुढिल काळात या ग्रंथाचा हिंदूंच्या सांस्कृतीक वारशाचा आढावा अल्बेरूनीने घेतला हिंदू समाजाच्या बलस्थानाबरोबरच उणीवांचाही अभ्यास अल्बेरूनीने केला. गझनीच्या आक्रमणामुळे हिंदू राजांना विध्वंस आणि अपमान सहन करावा लागला. यामागील कारणेही अल्बेरूनीने स्पष्ट केली आहेत. आपल्या ग्रंथ लिखाणासाठी त्याने संस्कृत साहित्याचा आधार घेतला.

**ताजुल - मासिर :-**

हसन निजामी याने ताजूल मासिर हा ग्रंथ लिहला. हसन हा मुळचा खुरासानचा राहणारा होता. सुरुवातीला त्याने महंमद घोरीकडे नोकरी केली. कुतूबुउद्दीन ऐबकने सुलतानशाही स्थापन करण्यापूर्वी आणि झाल्यावरही हसन प्रशासकीय पदावर होता. भारतात मुस्लिम सत्तेच्या स्थापनेचा काळ त्याच्या या ग्रंथातून लक्षात येतो मुस्लिम सत्ता स्थापन होत असताना भारताची स्थिती कशी होती याची माहिती हसन निजामीच्या ग्रंथातून मिळते. महमंद घोरी आणि गुलाम घराण्याचा संस्थापक कुतुबुद्दीन ऐबक यांच्या कारकीर्दीची माहिती या ग्रंथातून प्राप्त होते.

**किताब -उल - रहला :-**

हा ग्रंथ मोरोक्कोचा प्रवाशी इब्नबतुताने लिहिला आहे. ते त्याचे प्रवास वर्णन आहे. जे अरबी भाषेत रचलेले आहे. या ग्रंथात त्यांने महंम्मद तुघलकाचा दरबार, त्याचे नियम, रीती-रीवाज, परंपरा, गुलाम प्रथा आणि स्त्रीयांची स्थिती यांचे सुंदर वर्णन केलेले आहे. त्याने केलेले वर्णन हे निःपक्षपाती स्वरुपाचे आहे.

**समारोप :-**

सल्तनतकालीन इतिहासांची माहिती घेण्यासाठी जी लिखित साधने उपलब्ध आहेत त्यापैकी कल्हनचे राजतरंगिणी, चचनामा, तारिख - उल-हिंद, ताजुल-मासीर, किताब - उल-रहला हे ग्रंथ अत्यंत महत्वाचे ठरतात. यातील माहितीच्या आधारे आपल्याला सल्तनतकालीन दरबारी कामकाज, सुलतानांचे नियम, रीतीरिवाज, परंपरा, गुलाम प्रथा, आणि त्या काळातील स्त्रियांची स्थिती यांच्या विषयीची पूर्ण माहिती या साधनांद्वारे मिळते. म्हणून हि साधने महत्वाची वाटतात.

**संदर्भ :-**


1. शर्मा एल.पी., मध्यकालीन भारत, पृष्ठ 9, 10.
2. रिजवी एस.ए., तुघलककालीन भारत (भाग-1), पृष्ठ 6.
3. इलियट एवं डाऊसन, भारत का इतिहास (तृतिय खंड), पृष्ठ 45.
4. डॉ. तांबोळी एन.एस., प्राचीन आणि मध्ययुगीन भारत, खंड -1, पृष्ठ 118.
5. डॉ. ईश्वरी प्रसाद, भारतीय मध्ययुग का इतिहास, पृष्ठ 27.
6. डॉ. नागोरी एस.एल., मध्यकालीन भारत, श्री सरस्वती सदन, नई दिल्ली, पृष्ठ 162,163.


1. ईश्वर एक आहे आणि तो सगळीकडे व्यापलेला आहे. ईश्वर मंदीर, मजिदी मध्ये नाही तो सगळीकडे व्यापला आहे.
2. सूफी संतानुसार नमाज पडल्यामुळे रोजा धरल्यामुळे मन पवित्र राहते. व मुक्ती मिळते.
3. अहंकार नष्ट झाल्यावरच व्यक्ती ईश्वराचे दर्शन करू शकतो.
4. **4.** सूफी संतानी एकमेकांवर प्रेम व एकत्रित जेवण यावर भर दिला. निजामुद्दिन औलीयांनी म्हटले होते, हे मुस्लीमांनो तिच व्यक्ती अल्लाला प्रिय आहे.

❑❑❑